# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा/५२७/२०२१-२२ दिनांक :- २८/०९/२०२२

प्रति,
सिस्टम ॲनालिस्ट,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**विषय:- संकेतस्थळावर जाहीर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामातील बाधीत होणारी / धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामाची सोबत जोडलेली जाहीर नोटीस सुचना मिरा भाईदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहीर नोटीस प्रत.

(योगेश गुणिजन)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा / 527 /2021-22

दिनांक :- 28/01/2022

### // जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| 1. | सदर झाड भाईंदर (प.) डॉन बॉस्को शाळेजवळील व्यंकटेश पार्क 90 फुट रोड येथिल श्री पीरबाबा रामदेव उद्यानात पत्राशेड बसविण्याचे काम सुरू होणार असून सदर कामात बाधीत होत असल्याने सदर झाडे मुळासहित काढूण पुर्नरोपन करणे आवश्यक आहे. **(मा. कार्यकारी अभियंता (मिळकत) यांचे जा.क्र मनपा/मिळकत/565/ 2021-22 दि.20/12/2021 रोजीचे पत्र)** | 01 नग अशोक<br>02 नग आरेका पाम |
| 2. | सदर झाड भाईंदर (प.) पोलीस स्टेशन व जुने प्रभाग समिती कार्यालय मधील आतिल बाजुस वाढलेले असून झाडाच्या फांदया बाजुला असलेल्या पोलीस स्टेशनवर पडून नुकसान होत आहे. या कारणास्तव सदर 01 नग निलगिरीचे झाड तातडीने काढणे आवश्यक आहे. **(मा.कार्यकारी अभियंता (सा.बां.) यांचे जा.क्र मनपा/ सा.बां./ 4877/ 2021-22 दि.11/11/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग निलगीरी |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

(योगेश गुणिजन)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner